मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


www.newsexpressmarathi.com
पुणे, पिंपरी-चिंचवड
सोमवार, दि. 29 डिसेंबर 2025 | पान- 1

# कडेकोट बंदोबस्तात ईव्हीएम यंत्रे पिंपरीत दाखल!

## चार स्वतंत्र वाहनांच्या ताफ्यातून पूर्वनियोजित मार्गानुसार वाहतुकीचा दावा

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी वापरण्यात येणारी ईव्हीएम यंत्रे व निवडणूक अनुषंगिक साहित्य महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार बीड व कोल्हापूर जिल्ह्यातील संबंधित तालुक्यांतून पिंपरी येथे सुरक्षितरीत्या आणण्यात आले आहे.



यामध्ये बीड जिल्ह्यातील गेवराई, पाटोदा व आष्टी तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी, आजरा, कागल, भुदरगड, गडहिंग्लज व चंदगड येथील ईव्हीएम यंत्रांचा समावेश आहे. हे साहित्य चार स्वतंत्र वाहनांच्या ताफ्यामध्ये, पूर्वनियोजित मार्ग व नकाशानुसार पिंपरी येथे आणण्यात आले.

या संपूर्ण कामकाजासाठी नियुक्त नोडल अधिकारी प्रमोद ओंभासे यांच्यासह सहाय्यक नोडल अधिकारी सुनील पवार, अभिमान भोसले, संतोष कुदळे, राहुल पाटील व इंद्रजीत जाधव यांच्या समन्वयाने सुमारे २७ महापालिका कर्मचारी, १२ व्हिडिओ कॅमेरामन व १६ सशस्त्र पोलिस कर्मचारी असा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या निर्देशानुसार तयार करण्यात आलेल्या सुसज्ज स्ट्रॉंग रूममध्ये ही सर्व ईव्हीएम यंत्रे सुरक्षित ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावेळी स्थानिक राजकीय पक्षांचे नियुक्त पदाधिकारी यांना पुर्वसुचना देऊन नियमानुसार पाहणीसाठी बोलविण्यात आले होते.

सर्व वाहनांच्या सीलबंद स्थितीची उपस्थित पोलिस अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या समक्ष खातरजमा करून सील उघडण्यात आली. त्यानंतर ईव्हीएम यंत्रे स्ट्रॉंग रूम अधिकारी संजय काशिद, सत्वशील शितोळे व इतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुरक्षितरीत्या उतरविण्यात आली. सध्या सर्व ईव्हीएम यंत्रे निवडणूक आयोगाच्या नियमावलीनुसार सीलबंद स्थितीत सुरक्षित ठेवण्यात आली असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यात आली आहे.

# मतदान जागृतीसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचा अभिनव उपक्रम

## मोबाईल टॉर्चच्या प्रकाशातून भक्ती शक्ती येथे युवकांचा मतदानाचा संदेश

**पिंपरी | प्रतिनीधी**

भक्ती शक्ती येथे जमलेल्या शेकडो युवकांनी क्षणातच वातावरण बदलले. अचानक सर्वांनी मोबाईलचे टॉर्च प्रज्वलित करत एकत्र येत 'VOTE' असा शब्द साकारला आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत येत्या १५ जानेवारीला मतदान करण्याचा संदेश दिला.



पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाली असून या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत शहरातील विविध भागात मतदान जनजागृती साठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने भक्ती शक्ती चौक येथे मतदान जनजागृतीसाठी एक अनोखा व प्रभावी उपक्रम राबविण्यात आला.

लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदानाचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. उपस्थित नागरिकांनी आपल्या मोबाईल फोनवरील टॉर्चच्या प्रकाशाच्या सहाय्याने एकत्र येत 'VOTE' असा शब्द साकारत मतदानाचा संदेश दिला. अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या या प्रतिकात्मक उपक्रमातून "मतदानानेच लोकशाही उजळते" हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

### उपस्थितांना देण्यात आली मतदानाची शपथ

**» आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, अशी शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.**

महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या प्रमुख उपस्थितीत राबवण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले गेले. मतदान हा प्रत्येक पात्र नागरिकाचा मूलभूत हक्क असून, तो निर्भयपणे व जबाबदारीने बजावणे आवश्यक आहे, हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला. विशेषतः युवक व प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांमध्ये या उपक्रमामुळे उत्साह दिसून आला. यावेळी फ्लॅश मॉब चे सादरीकरण देखील करण्यात आले. तसेच लोकशाही सशक्त करण्यासाठी प्रत्येकाचे मतदान आवश्यक आहे, या भावनेतून नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रभाग क्र. 11 मध्ये भाजपाचा प्रचार वेगात

## विकास, एकजूट आणि जनविश्वासाच्या बळावर प्रभाग 11 मध्ये भाजपाचा निर्धार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ११ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या इच्छुक उमेदवारांनी प्रचारात स्पष्ट आघाडी घेतली आहे. भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांचे कट्टर समर्थक सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, माजी नगरसेविका योगिता नागरगोजे आणि रिटा सानप यांनी एकजुटीने प्रचाराचा धडाका सुरू केला आहे.



यावेळी उद्योजक कार्तिक लांडगे, महादेव दादा कवितके, संतोष ठाकूर, अरुण पाडुळे, कविता हिंगे, सुधाकर धुरी, अजय सायकर, विजय घोडके, बालाजी कनवटे, यशवंत कन्हेरे, अशोक मगर, प्रकाश धोंडे आदी उपस्थित होते.

प्रभाग क्र. ११ अंतर्गत नेवाळे वस्ती, हरगुडे वस्ती, कुदळवाडी भाग, कृष्णानगर, शरदनगर, कोयनानगर, महात्मा फुलेनगर, पुर्णानगर, शिवाजी पार्क, शिवतेज नगर, म्हेत्रे वस्ती, स्वस्त घरकुल प्रकल्प, अजंठानगर, दुर्गानगर आदी भागांचा समावेश असून या सर्व परिसरात भाजपाच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

प्रचाराची सुरुवात चिखली येथील श्री विठ्ठल-रुक्मीणी मंदिरात दर्शन व आशीर्वाद घेऊन करण्यात आली. त्यानंतर हजारो नागरिकांच्या उपस्थितीत प्रचाराचा भव्य शंखनाद झाला. "विकास, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक प्रगती" या मुद्द्यांवर भर देत भाजपाच्या इच्छुक उमेदवारांनी घराघरांत जाऊन संवाद साधण्यास सुरुवात केली आहे.

यावेळी स्थानिक विकासकामांचा लेखाजोखा मांडत आगामी काळातील पायाभूत सुविधा, नागरी सोयी-सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते व सुरक्षितता यांसाठी ठोस आराखडा सादर करण्यात आला. संघटित प्रचार, अनुभवी नेतृत्व आणि कार्यकर्त्यांची ताकद यामुळे प्रभाग क्रमांक ११ मध्ये भाजपाचा प्रचार अधिक प्रभावी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे. एकूणच, प्रभाग ११ मध्ये भाजपाच्या एकजुटीने सुरू झालेल्या प्रचारामुळे निवडणुकीच्या रणधुमाळीत वातावरण तापू लागले असून आगामी दिवसांत राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची चिन्हे आहेत.

> "प्रभाग क्रमांक ११ मधील प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा, विकासकामे आणि सुरक्षित भवितव्य हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली प्रभागाचा सर्वांगीण विकास करून हा परिसर पिंपरी-चिंचवडमधील आदर्श प्रभाग म्हणून उभा करू, हीच आम्ही जनतेला ठाम हमी देतो.
>
> **- निलेश नेवाळे, उमेदवार, भाजपा, प्रभाग- 11.**



# राष्ट्रवादी (अजित पवार गट) मधून भाजपमध्ये प्रवेशांची मालिका कायम

## महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपची संघटनात्मक ताकद वाढली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश सुरूच असून, शहरातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. या घडामोडींमुळे भाजपची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम होत असून राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसत असल्याचे चित्र आहे.

मागील आठवड्यात भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार पैलवान महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजप प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी (अजित पवार गट) मधील २२ माजी नगरसेवकांनी हजारो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला होता. या प्रवेशामुळे शहरातील राजकारणात खळबळ उडाली असून, भाजपचा प्रभाव वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

दिघी परिसरातही अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. दिघी गावातील ज्येष्ठ नेतृत्व म्हणून ओळख असलेले श्री. दत्तात्रय आबा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भाजपने सातत्याने विकासकामांच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन केला आहे. परिणामी, या प्रभागातून भाजपचे चारही उमेदवार निवडून येण्याची परंपरा आजवर कायम राहिली आहे.

याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील माजी पदाधिकारी व युवकांमध्ये प्रभाव असलेले श्री. अमोल देवकर (पिंपरी-चिंचवड शहर सरचिटणीस), तसेच श्री. अभिजीत घोलप (रा.कॉं. पदवीधर संघ, भोसरी विधानसभा अध्यक्ष) आणि स्वप्नील दळवी (प्रभाग अध्यक्ष, युवामोर्चा राष्ट्रवादी) यांनी आज आमदार श्री. महेशदादा लांडगे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला.



हा प्रवेश भाजपचे युवा नेते श्री. कार्तिक लांडगे यांच्या पुढाकारातून घडून आल्याने युवक वर्गामध्ये भाजपप्रती उत्साह आणि विश्वास अधिक दृढ झाल्याचे दिसून येत आहे. तसेच सामाजिक कार्यात सक्रिय असलेले व युवा नेतृत्व म्हणून शहरभर ओळख निर्माण केलेले श्री. उदय दत्तात्रय गायकवाड यांच्या कार्याचीही विशेष दखल घेतली जात असून, दिघी-बोपखेल प्रभागात भाजपची स्थिती आणखी मजबूत होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

दरम्यान, नवीन, ऊर्जावान आणि जनतेशी थेट संपर्क असलेल्या नेतृत्वाला संधी देण्याची भाजपची रणनीती यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे भाजप निवडणूक प्रमुख आमदार श्री. शंकर जगताप यांनीही यंदाच्या निवडणुकीसाठी "अबकी बार १०० नहीं, १२५ पार" असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

# पुणे महापालिकेला जलसंपदा विभागाचा झटका; 'कल्व्हर्ट'साठी जागा देण्यास नकार

## आंबेगाव खुर्द गावठाणाकडे जाण्यासाठी नाल्यावर रस्ता बांधण्यासाठी 50 गुंठे जागा महापालिकेला देण्यास जलसंपदा विभागाने नकार दिला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव खुर्द गावठाणाकडे जाण्यासाठी नाल्यावर रस्ता (कल्व्हर्ट) बांधण्यासाठी ५० गुंठे जागा महापालिकेला देण्यास जलसंपदा विभागाने नकार दिला आहे. जांभूळवाडी तलावालगतची ही जागा आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत जागा न देण्याचा ठराव मंजूर करण्यात आल्याची माहिती जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, पाणीपट्टीपोटीची ८६८ कोटी रुपयांच्या थकबाकीची रक्कम महापालिका जलसंपदाला विभागाला देत नाही. त्यामुळे थकबाकी भरल्याशिवाय महापालिकेला सहकार्य नाही, असा पवित्रा जलसंपदा विभागाने घेतला आहे.



### महानगरपालिकेकडून जागेची मागणी

» जलसंपदाच्या मालकीची सुमारे ५० गुंठे जागेची महानगरपालिकेने मागणी केली. नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रकांच्या रेडिरेकनर दरानुसार प्रतिचौरस मीटर पाच हजार रुपये दर आहे. ५० गुंठे म्हणजेच पाच हजार चौ.मी. क्षेत्राचे तसेच भारतीय स्टेट बँकेच्या कर्जदरानुसार १५.३१ टक्क्यांनुसार भाड्याने जागा देण्यासाठी ३७ लाख ८७ हजार ५०० रुपये एवढी प्रतिवर्ष भाड्याची रक्कम होते,.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची शुक्रवारी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. जांभूळवाडी तलावाजवळच्या भागाला जोडण्यासाठी रस्त्यासाठी जागा देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. आंबेगाव (जांभूळवाडी) येथे लघु पाटबंधारे तलाव आहे. आंबेगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक तसेच नऱ्हे गाव हे या योजनेचे लाभक्षेत्र आहे. ही गावे महानगरपालिकेत समाविष्ट झाली आहेत. त्या भागांत विविध उद्योग असल्याने शेतीचे क्षेत्र इतर कारणांसाठी वापरले जात आहे. त्यामुळे प्रकल्पास सिंचनासाठी लाभक्षेत्र शिल्लक राहिले नाही.

आंबेगाव खुर्द येथील जांभुळवाडी तलावालगत अस्तित्वात असलेला कल्व्हर्ट लगत नवीन जोड कल्व्हर्ट बांधण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी ३० एप्रिलला पत्र पाठवून जलसंपदा विभागाची परवानगी मागितली होती. त्या वेळी महापालिकेकडून अस्तित्वात असलेल्या पुलाला समांतर ५० मीटर लांब आणि १० मीटर रुंद असा जोड कल्व्हर्ट बांधण्यात येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले होते. या प्रस्तावित कल्व्हर्ट बांधकामासाठी जलसंपदा विभागाची जागा कायमस्वरुपी लागणार असल्याने ही जागा महानगरपालिकेस कायमस्वरुपी किंवा भाडेपट्ट्याने देण्यासाठी नियामक मंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव ठेवण्यात आला.

### जागा कायमस्वरुपी देण्यास नकार

» कायमस्वरुपी जागा दिल्यास त्यातून अडीच कोटींची रक्कम जलसंपदाला मिळू शकते. मात्र, ही जागा भाडेपट्ट्याने दिल्यास सरकारी जागेचे संवर्धन होण्याबरोबर सरकारच्या महसूलात वाढ होईल. त्यामुळे ही जागा कायमस्वरुपी देण्यास नकार देण्यात आल्याचे जलसंपदा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

### रस्त्यासाठी जागा देण्याचा प्रस्ताव

» जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. जांभूळवाडी तलावाजवळच्या भागाला जोडण्यासाठी रस्त्यासाठी जागा देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. आंबेगाव (जांभूळवाडी) येथे लघु पाटबंधारे तलाव आहे. आंबेगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक तसेच नऱ्हे गाव हे या योजनेचे लाभक्षेत्र आहे. ही गावे महानगरपालिकेत समाविष्ट झाली आहेत.

जलसंपदाच्या मालकीची सुमारे ५० गुंठे जागेची महानगरपालिकेने मागणी केली. नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रकांच्या रेडिरेकनर दरानुसार प्रतिचौरस मीटर पाच हजार रुपये दर आहे. ५० गुंठे म्हणजेच पाच हजार चौ.मी. क्षेत्राचे तसेच भारतीय स्टेट बँकेच्या कर्जदरानुसार १५.३१ टक्क्यांनुसार भाड्याने जागा देण्यासाठी ३७ लाख ८७ हजार ५०० रुपये एवढी प्रतिवर्ष भाड्याची रक्कम होते, तर कायमस्वरुपी जागा दिल्यास त्यातून अडीच कोटींची रक्कम जलसंपदाला मिळू शकते. मात्र, ही जागा भाडेपट्ट्याने दिल्यास सरकारी जागेचे संवर्धन होण्याबरोबर सरकारच्या महसूलात वाढ होईल. त्यामुळे ही जागा कायमस्वरुपी देण्यास नकार देण्यात आल्याचे जलसंपदा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

---

# मार्च 2026 पर्यंत पीएमपीच्या ताफ्यात 4 हजार बस; उत्पन्न 4 कोटींचे लक्ष्य

## पीएमपीच्या ताफ्यात सीएनजी व इलेक्ट्रिक बसवर भर, मेट्रो फीडरसाठी 500 बसची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

नवीन वर्षात मार्च अखेरपर्यंत ताफ्यात नव्या बस दाखल करण्याचे पीएमपी प्रशासनाने नियोजन आहे. नवीन वर्ष 2026 मध्ये पीएमपीच्या बसची एकूण संख्या 4 हजारांवर नेण्याचे लक्ष्य पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी ठेवले आहे. या विस्तारासोबतच पीएमपीचे दैनंदिन उत्पन्न 4 कोटी रुपयांपर्यंत नेण्याचा निर्धारही त्यांनी दै.'पुढारी'शी बोलताना व्यक्त केला




पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी असलेल्या पीएमपीच्या सेवेचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि पुणेकरांना पुरेशा बस उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. सर्वंकष वाहतूक आराखड्यानुसार शहराच्या लोकसंख्येसाठी आवश्यक असलेली बससंख्या सध्या पीएमपीच्या ताफ्यात उपलब्ध नाही. त्यामुळे शहरात खासगी वाहनांची संख्या वाढत आहे. परिणामी, शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत आहे. हे कमी करण्यासाठी आणि पुणेकरांना आवश्यक असलेल्या बसचा पुरवठा करण्यासाठी पीएमपी अध्यक्ष देवरे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए भागातील लोकसंख्येसाठी पहिल्या टप्प्यात 4 हजार बस उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. दुसऱ्या टप्प्यात आणखी बस आणण्याचाही त्यांचा विचार आहे. आणि पहिल्या टप्प्यातील या चार हजार बस नवीन वर्षात सन 2026 मधील मार्च अखेरच्या आतच आणण्याचे नियोजन सुरू असल्याचे देवरे यांनी सांगितले.

> पुणेकरांना वेळेवर आणि दर्जेदार बस सेवा देणे, हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही मार्चअखेर 2026 पर्यंत जास्तीत जास्त बस ताफ्यात आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत. 4 हजार बसचे लक्ष्य पूर्ण झाल्यास शहरातील सार्वजनिक वाहतुकीचा ताण कमी होईल आणि उत्पन्नातही वाढ करण्याचे आमचे लक्ष आहे, उत्पन्नात वाढ झाल्यामुळे प्रवाशांना अधिक चांगल्या सोयी-सुविधा पुरवता येतील.
>
> - पंकज देवरे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल

शहराचा वाढता विस्तार आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, सध्या असलेली बस संख्या अपुरी पडत आहे, हे चित्र बदलण्यासाठी मार्च 2026 पर्यंत टप्प्याटप्प्याने नवीन बस ताफ्यात सामील केल्या जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने सीएनजी आणि पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक बसचा समावेश असेल. बसची संख्या वाढल्यामुळे मार्गावरील बसची वारंवारता वाढेल आणि प्रवाशांचे वेटिंग कमी होण्यास मोठी मदत होणार आहे, असेही ते म्हणाले.

# महाशिवरात्रला भीमाशंकर दर्शन सुरु राहणार; 8 जानेवारीपासून मंदिर तीन महिने बंद

## जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या उपस्थितीत बैठकीत मंदिर बंद ठेवण्यावर शिक्कामोर्तब.

**पुणे | प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व दर्शन बारीतील पायरी मार्गाच्या बांधकामासह भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी मंदिर शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी (महाशिवरात्रीचा कालावधी वगळून) दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानने घेतला आहे. या निर्णयाची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली असून भाविकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

राज्य शासनाने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्त्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी सुरू होत असून प्रत्यक्ष बांधकामाच्या काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने मंदिर तात्पुरते बंद ठेवणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### महाशिवरात्रला भीमाशंकर दर्शन सुरु राहणार

» श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार तसेच भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढील तीन महिन्यांसाठी दर्शनाकरिता बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, भाविकांच्या सोयीसाठी महाशिवरात्रीचा कालावधी १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मंदिर दर्शनासाठी खुले राहणार आहे.

या संदर्भात मंगळवार, दि.२३ रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार तसेच भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढील तीन महिन्यांसाठी दर्शनाकरिता बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, भाविकांच्या सोयीसाठी महाशिवरात्रीचा कालावधी १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मंदिर दर्शनासाठी खुले राहणार आहे.

सन २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात लाखो भाविक भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था व गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार नियमित सुरू राहणार आहेत. मात्र, या कालावधीत थेट दर्शन पूर्णपणे बंद राहील. बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी-कर्मचारी व भीमाशंकर ग्रामस्थ वगळता इतर कोणालाही मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून भाविक व स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे." असे आवाहन करण्यात आले.

### प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन

» जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी सांगितले की, "श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचा विकास दीर्घकालीन सुरक्षितता व भाविकांच्या सोयीसाठी अत्यावश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून भाविक व स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे." असे आवाहन करण्यात आले.

### कोणालाही मंदिर परिसरात प्रवेश नाही

» मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार नियमित सुरु राहणार आहेत. मात्र, या कालावधीत थेट दर्शन पूर्णपणे बंद राहील. बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी-कर्मचारी व भीमाशंकर ग्रामस्थ वगळता इतर कोणालाही मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

# बिबट्यांच्या मागावर आता 'एआय' आणि ड्रोनची नजर! जुन्नर वनविभागाचा हायटेक प्लान

## माणिकडोह केंद्राचे विस्तारीकरण आणि नवीन चार निवारा केंद्रांची निर्मिती; बिबट्यांच्या व्यवस्थापनासाठी प्रशासनाची मोठी धडपड.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर व दौंड तालुक्यांमध्ये दिवसेंदिवस बिबट्याची दहशत वाढत असून, मानव-बिबट संघर्ष टाळण्यासाठी प्रशासनाची धडपड वाढली आहे. ऊसाचे विस्तीर्ण क्षेत्र, डोंगराळ भूभाग व दाट लपणामुळे बिबट्यांना सहज आश्रय मिळत असल्याने संघर्षाची शक्यता वाढत आहे.जुन्नर वनविभागाच्या कार्यक्षेत्रात जुन्नर, ओतूर, शिरूर, घोडेगाव, मंचर, राजगुरुनगर व चाकण या वनपरिक्षेत्रांचा समावेश होतो.

मानव व बिबट यांच्यातील संघर्ष कमी करण्याबरोबरच बिबट्यांचे शास्त्रीय व्यवस्थापन करण्यासाठी वनविभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. कलापथकांच्या माध्यमातून विविध गावांमध्ये व शाळांमध्ये सुमारे 55 जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच विषयतज्ज्ञ श्री. सौमित्र यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे 50 गावांमध्ये ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बिबट जनजागृती व वनविभागाच्या योजनांची माहिती देण्यात आली.

बिबट हल्ल्यांपासून घ्यावयाच्या खबरदारीसाठी पोस्टर, घडीपत्रके व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या काळात बिबट नसबंदी, शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा, माणिकडोह बिबट निवारा केंद्राचे विस्तारीकरण, स्पेशल टायगर प्रोटेक्शन फोर्सच्या धर्तीवर स्पेशल लेपर्ड प्रोटेक्शन फोर्स, बिबट्यांचे इतर संरक्षित क्षेत्रात स्थानांतरण व नवीन चार बिबट निवारा केंद्रांची निर्मिती प्रस्तावित आहे.



### पायाभूत सुविधा व प्रस्तावित योजना

» एकटी घरे व गोठ्यांसाठी सौर कुंपण, मेंढपाळ व ऊसतोड कामगारांना सौर दिवे व टेन्ट, एकूण 400 पिंजरे कार्यान्वित असून त्यामधून आतापर्यंत 75 बिबटे पकडण्यात वनविभागाला यश आले आहे. आपदा मित्र व प्राथमिक बचाव दल सदस्यांना प्रशिक्षण, नागरिकांना नेक गार्डचे वाटप, अनायडर्स मशीन कार्यान्वित करण्यात आले आहे.

### 'बिबट कृती दल' बेस कॅम्प

» अतिसंवेदनशील गावांमध्ये 247 जनजागृतीसाठी 'बिबट कृती दल' स्थापन करण्यात आले आहे. पिंपरखेड, न्हावरा, भीमा कोरेगाव (ता. शिरूर), आळे, नगदवाडी (ता. जुन्नर) व गावडेवाडी (ता. आंबेगाव) येथे हे बेस कॅम्प कार्यरत असून, मागील दोन वर्षात शिरूरच्या पश्चिम भागात तसेच आंबेगाव व जुन्नरच्या पूर्व भागात मानव-बिबट संघर्ष मोठ्या प्रमाणात नियंत्रित झाला आहे.